




दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक १८२ •बुधवार, दि. ०१ ऑक्टोबर २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955







### नवरात्र उत्सव

**दहावी माळ**



दशमीचे दिवशी अंबा निघे
सिमोल्लंघनी होसिंहारूढ
करि सबल शस्त्रे ती घेउनी
होशुंभनीशुंभादीक राक्षसा
किती मारसी राणी होविप्रा
रामदासा आश्रय दिधला तो
चरणी हो ।। १० ।।
उदो बोला उदो अंबा बाई
माउलीचा होउदोकार गर्जती
काय महिमा वर्णू तिचा हो
।। धृ ।।

# गोदावरीच्या पाण्याने घेरले; खा.सोनवणेंनी पाण्यातून जात पुरग्रस्तांचे पुसले आश्रू

## बैलगाडी, दुचाकीवर बसून घेतल्या नुकसानग्रस्तांच्या भेटी

**माजलगाव । प्रतिनिधी**

आधीच जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे नद्या दुथडी वाहत असताना जायकवाडी धरणातून ३ लाख क्यूसेस पाणी सोडण्यात आले. परिणामी, गोदावरीच्या पाण्याने माजलगाव तालुक्यातील अनेक गावांना घेरले आहे. दि.३०सप्टेंबर रोजी खा.बजरंग सोनवणे यांनी पाण्यात असलेल्या गावात जावून पुरग्रस्तांचे आश्रू पुसले. यावेळी पुराच्या पाण्यातून गावात जाण्यासाठी त्यांनी बैलगडी, दुचाकीचाही वापर केला. बीड जिल्ह्यात दि.१४ सप्टेंबरपासून पाऊस आहे. मध्यल्या काळात अनेकदा अतिवृष्टी झाली. यामुळे सर्वच नद्यांना महापूर आला. नद्यांचे पाणी काही प्रमाणात कमी झाली झाले असताना जायकवाडी धरणातून दोन दिवसांपुर्वी ३ लाख क्यूसेस ▶▶ उर्वरित पान २ वर

**• तरूण शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी**

**कवडगावथडी येथे खा.बजरंग सोनवणे हे पोहचल्यानंतर एका तरूण शेतकऱ्यांने रस्त्याशेजारी असलेल्या शेतातील पाण्यात उडी मारली. त्याठिकाणी या शेतकऱ्याचे अडीच एक्कर हळदीचे पिक आहे. त्या शेतकऱ्याने पाण्यात बुडी घेवून हळदीचे पिक उपटून दाखवायला आणले. यानंतर त्या तरूणाला आश्रू अनावर झाले. त्याच्या डोळ्यातील आश्रू पाहून खा.बजरंग सोनवणे यांनी तु काळजी करू नको, तुला उभा करण्यासाठी शासन स्तरावरून मदत मिळवून देतो, त्यासाठी मी तुमच्या पाठिशी आहे, असे म्हणून तरूणाला धीर दिला.**



# निसर्गाचं चक्रच फिरलं! आधी धो धो पाऊस, यंदा 'ऑक्टोबर हीट'चे चटकेही नाही, हवामान विभागाचा अंदाज काय ?

**मुंबई । प्रतिनिधी**



गेल्या पंधरा दिवसांपासून राज्यभरात पावसाने घातलेले थैमान हळूहळू ओसरत आहे. एकीकडे पूरस्थिती आटोक्यात येत असताना दुसरीकडे ऑक्टोबर महिन्याचा हवामान अंदाज भारतीय हवामान खात्याने जाहीर केला आहे. यंदा ऑक्टोबर महिन्यात नेहमी जाणवणारे उन्हाचे चटके (जर्लीलशी क्शरीं) बसणार नाहीत असं आयएमडीने म्हटले आहे. ऑक्टोबर महिन्यातही सरासरीच्या तुलनेत अधिक पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. यंदा नेहमीपेक्षा आठवडाभर आधीच दाखल झालेल्या नैऋत्य मोसमी पावसाने आपला मुक्कामही जरा जास्तच लांबवलाय. सप्टेंबरमध्ये पावसाने आपले रौद्ररूप दाखवलं असलं तरी वारंवार होणारी पूर सदृश स्थिती, भूकंपाच्या घटना, अतिवृष्टी अशा कितीतरी घटना निसर्गाचं चक्र फिरल्याचीच जाणीव करून देणाऱ्या आहेत भारतीय हवामान विभागाने यंदा ऑक्टोबर महिन्याचा अंदाज जाहीर केला असून नेहमीप्रमाणे जाणवणारे उष्णतेचे चटके यंदा ऑक्टोबर मध्ये टळणार आहेत. यंदा राज्यभर ऑक्टोबर महिन्यात सरासरीच्या तुलनेत अधिक पावसाचा इशारा देण्यात आला आहे. ऑक्टोबरमध्ये कोकण मध्य महाराष्ट्रात सरासरीपेक्षा जास्त पाऊस ▶▶ उर्वरित पान २ वर

# धनंजय मुंडेंच्या माध्यमातून परळी मतदारसंघातील 5 ग्रामपंचायत बांधकामास निधी मंजूर

## स्व. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेतून परळी मतदारसंघातील ५ ग्रामपंचायत बांधकामास १ कोटी १५ लाख निधी मंजूर

**परळी वै. । प्रतिनिधी**

परळीचे आमदार तथा माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून परळी वैद्यनाथ विधानसभा मतदारसंघातील आणखी ५ ग्रामपंचायतींचे रुपडे पालटणार असून, स्वतःची ग्रामपंचायत इमारत नसलेल्या ५ ग्रामपंचायतींच्या ग्रामपंचायत बांधकामास राज्य



सरकारच्या वतीने एकूण १ कोटी १५ लाख रुपये निधी ग्रामविकास विभागाच्या वतीने मंजूर करण्यात आले आहेत.

धनंजय मुंडे यांच्या निर्देशानुसार मतदारसंघातील स्वतःची इमारत नसलेल्या ग्रामपंचायत इमारत बांधकामासाठी निधी मागणी प्रस्तावित करण्यात आली होती. त्यानुसार ग्रामविकास विभागाने परळी तालुक्यातील मरळवाडी (२० लाख), लाडझरी (२५ लाख), रेवली (२५ लाख), तसेच अंबाजोगाई तालुक्यातील धानोरा बुद्रुक (२५ लाख) व निरपणा (२० लाख) याप्रमाणे निधी मंजूर केला असून, याबाबतचा शासन निर्णय निर्गमित ▶▶ उर्वरित पान २ वर

## राजुरी मळा तांड्या जवळ मोटारसायकलची समोरासमोर धडक दोन युवक जागीच ठार

**तलवाडा । प्रतिनिधी**



गेवराई तलवाडा मार्गे माजलगाव रोडवर तलवाडा पासुन चार कि. मी. च्या अंतरावर राजुरी मळा तांडा येथे मोटार सायकलच्या समोरासमोर झालेल्या अपघातात दोन युवक जागीच ठार झाल्याची घटना तलवाडा पोलिस स्टेशन हद्दीती मंगळवारी दुपारी २ च्या सुमारास घडली.या अपघातात नवनाथ उत्तम राठोड रा.देवितंडा वय ३५ आणि विजय उर्फ बाळू सीताराम शिंदे रा.राजुरी मळा तांडा तहत तलवाडा वय वर्षे ३५ यांचा समावेश आहे. गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलिस ठाणे हाद्दीतील गेवराई माजलगाव रोड वरील राजुरी मळा तांडा याठिकाणी मंगळवारी दुपारी दोन ते अडीच्या दरम्यान दोन मोटार सायकल ची समोरासमोर धडक झाली यामध्ये बाळू शिंदे आणि नवनाथ राठोड या दोन युवकांचा मृत्यू झाल्याची घटना घडली असून अपघाताची माहिती कळताच नागरिकांनी त्यांना ▶▶ उर्वरित पान २ वर

# ढाका कुटूंबियांचे एसपींना निवेदन

## भेट घेवून केली सर्व आरोपींच्या अटकेची मागणी

**पोलीसांनी कृष्णा सोनवणेला पकडले**

**यश ढाका हत्या प्रकरणात पोलीसांनी सकाळी कृष्णा सोनवणे यास पाटोदा येथून अटक केली आहे. या प्रकरणात आत्तापयरत सुरज काटे, सोमनाथ काटे यांना अटक केलेली आहे. कृष्णा सोनवणे हा या प्रकरणातील तिसरा अटक झालेला आरोपी आहे. या प्रकरणातील अन्य आरोपींच्या शोधासाठी एलसीबी टीम परराज्यात गेल्याचे सुत्रांनी सांगितले.**

**बीड । प्रतिनिधी**

माझ्या मुलाची अतिशय निर्दयीपणे हत्या करण्यात आली. यातील काही आरोपी अटक असले तरी कट रचणारे आरोपी मात्र मोकाट फिरत असल्याचे सांगून गणेश गोरख शिराळे याच्या टोळीने कटकारस्तान रचून माझ्या मुलाचा खून केल्याचा आरोप मयत यशचे ▶▶ उर्वरित पान २ वर

**पोलीस अधिक्षकांवर पुर्ण विश्वास: देवेंद्र ढाका**



**बीडचे पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांची दुपारी आम्ही भेट घेतली. माझ्यासह माझे कुटूंब देखील त्या ठिकाणी होते. यावेळी पोलीस अधिक्षकांशी सविस्तर चर्चा झाली. आमच्याकडे आरोपी संदर्भात जी काही माहिती होती ती पोलीस अधिक्षकांना दिली आहे. या प्रकरणातील फरार गणेश शिराळे व इतर आरोपींना तात्काळ अटक करून त्यांच्यावर अंडर ट्रायल करावी अशी मागणी केली आहे. पोलीस अधिक्षकांनी या प्रकरणाशी संबंधित कोणत्याही आरोपींना सोडणार नाही. त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल. आरोपींच्या मागे कोणीही असो आणि त्याच्यावर कोणाचाही वरदहस्त असला तरी पोलीस आपल्या पध्दतीने तपास करून नक्कीच न्याय देईल असे पोलीस अधिक्षकांनी सांगितले असून आम्हाला पोलीस अधिक्षकांवर पुर्ण विश्वास असल्याचे देवेंद्र ढाका यांनी माध्यमांशी बोलतांना सांगितले.**

## केजमधील कुंटणखान्यावर पोलिसांचा छापा ; आंटी अटकेत, पिडीतेची सुटका

**केज । प्रतिनिधी**

बीड पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष पथकाने सोमवारी सायंकाळी केज शहरातील गणेश नगर परिसरातील एका कुंटखान्यावर छापा टाकून एका आंटीला ताब्यात घेत एका पिडीतेची सुटका केली. यावेळी पैसे व साहित्य जप्त करण्यात आले असून प्रकरणी अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर

## पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांना सॅल्युट पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी दिली ५० हजाराची मदत

**बीड । प्रतिनिधी**



जिल्ह्यात गेल्या आठ दिवसात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. पूरस्थितीमुळे हतबल झालेल्या शेतकऱ्यांच्या मदतीसाठी अनेकांचे हात पुढे येत आहेत. विशेष म्हणजे त्यात बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत हे देखील मागे राहिले नसून आज त्यांनी पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी ५० हजार रुपयांची मदत पाठवली आहे. यातून पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी शेतकऱ्यांप्रती दाखवलेल्या भावना खरोखरच उल्लेखनीय आहे. एक उच्चपदस्थ अधिकारी असूनही त्यांनी स्वत... पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी रोख स्वरूपात मदत पाठवून केवळ बीड जिल्ह्यातीलच नव्हे तर राज्यातील अधिकाऱ्यांपुढे मोठा आदर्श ठेवला ▶▶ उर्वरित पान २ वर

## बीडमध्ये बांधकाम कामगारांचे बोगस ट्रेनिंग अन् फोटो शूट

### ४ हजार २०० च्या अनुदानासाठी दलाल अन् अधिकाऱ्यांची धावपळ

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील बांधकाम विभागामध्ये दलालांनी सुळसुळाट मांडला असून, गेल्या काही दिवसांपासून शासनाच्या निधीचा गैरवापर करत फसवणुकीचे सत्र सुरू असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. १५ दिवस प्रत्यक्ष ट्रेनिंग देऊन त्यासाठी ४ हजार २०० अनुदान देण्यात येणार आहे. हे अनुदान ▶▶ उर्वरित पान २ वर

## मासूम कॉलनी येथे घराची भिंत कोसळली ; सुदैवाने जीवितहानी टळली

**बीड । प्रतिनिधी**

शहरात शनिवार मध्यरात्री जोरदार वादळी वाऱ्यासह आलेल्या पावसामुळे मासूम कॉलनी येथील एका घराची भिंत कोसळल्याची घटना घडली आहे. रईसा बेगम अलिमोद्दीन यांच्या राहत्या घराची भिंत पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास कोसळली. सुदैवाने, या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र घराचे मोठे नुकसान झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रईसा बेगम अलिमोद्दीन यांच्या घराच्या दोन खोल्या या वादळी वाऱ्यासह आलेल्या पावसामुळे पूर्णपणे उद्ध्वस्त झाल्या आहेत. भिंत कोसळली तेव्हा यांचे कुटुंब घराच्या समोरच्या खोलीत झोपले होते. याच वेळी मागच्या खोलीची भिंत कोसळली, त्यामुळे कुटुंबातील सदस्य बचावले. घटनेनंतर ▶ उर्वरित पान २ वर

## 'सारथी' वसतिगृहे योजना प्रभावीपणे राबवा: डॉ. ज्योतीताई मेटे

**बीड । प्रतिनिधी**



मराठा, कुणबी आणि कुणबी मराठा समाजातील विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाच्या सोयीसाठी प्रत्येक जिल्ह्यात एक वसतिगृह सुरू करण्यात यावे अशी मागणी शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ.ज्योतीताई विनायकराव मेटे यांनी मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष मा.ना. श्री.राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. मराठा, कुणबी आणि कुणबी मराठा समाजातील विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाच्या सोयीसाठी प्रत्येक जिल्ह्यात एक वसतिगृह सुरू ▶▶ उर्वरित पान २ वर

## अतिवृष्टी मुळे बाधित झालेल्या रोहयो अंतर्गत सिंचन विहिरी कांदा चाळी आणि नष्ट झालेल्या फळबागा नुकसानी बाबत

# आ.सुरेश धस यांची मंत्री भरत गोगावले यांच्याकडे उपाययोजना करण्याची मागणी

**आष्टी । प्रतिनिधी**



विधानसभा मतदारसंघातील आष्टी पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यातील अनेक गावांमध्ये अतिवृष्टी आणि ढगफुटीमुळे शेतकऱ्यांचे नागरिकांचे अतोनात नुकसान झाले असून रोजगार हमी योजनेअंतर्गत मंजूर असलेल्या सिंचन विहिरी बोजल्या गेल्या वाहून गेल्या असून कांदा चाळ यांचे देखील अतोनात नुकसान झाले आहे त्याचबरोबर फळबागादेखील नष्ट झाल्या आहेत या शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीबाबत उपाययोजना करण्याची मागणी आमदार सुरेश धस यांनी रोहयो मंत्री भरत गोगावले यांचेकडे केली आहे आज मंत्रालयामध्ये प्रत्यक्ष मंत्री महोदयांची भेट घेऊन त्यांनी या मागणीबाबत निवेदन दिले असता मंत्री महोदयांनी सकारात्मक कारवाईचे आश्वासन दिले आहे. या भेटीत आष्टी,पाटोदा आणि शिरूर (कासार) तालुक्यातील अनेक गावातील अतिवृष्टीमुळे बुजलेल्या आणि वाहून गेलेल्या सिंचन विहिरींच्या दुरुस्तीबाबत चर्चा केली. दि. १४, १५ आणि १६ ऑगस्ट २०२५ या तीन दिवसांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे आष्टी तालुक्यातील मेहकरी, सीना, कांबळी, कडी, बोकडी आणि शिरूर (कासार) तालुक्यातील सिंदफणा, किना, ▶▶ उर्वरित पान २ वर




# हेक्टरी ५० हजारांची मदत का नाही? भीषणता, वास्तविकता आणि शेतकऱ्यांची हतबलता कोण लक्षात घेईल?

मराठवाड्यातील अतिवृष्टी व पुराची भीषण परिस्थिती अत्यंत विध्वंसक ठरली आहे. आमच्या टीमचे व स्थानिकांचे सोशल मीडियावरील पोस्ट्स वाचून व पाहून मला झोपच लागली नाही. संध्याकाळी सगळी कामं सोडून मी बीडकडे धावलो. आणि गेल्या अनेक दिवसांत मी वेड्यासारखा गावोगाव फिरत आहे, हजारो शेतकऱ्यांना भेटत आहे, वाळलेली व वाहून गेलेली शेतजमीन पाहत आहे, त्यांच्या आवाजातील वेदना व हताशपणा ऐकत आहे, त्यांच्या डोळ्यांतली यातना व वेदना जाणवत आहे. ते पुढे कसे जगतील? ते काही आकडेवारी नाहीत तर ते खरे माणसे आहेत, ज्यांच्यासोबत मी गेली सात वर्षे घालवली आहेत. निसर्गाच्या कोपाने केवळ पिकेच नाहीत तर संपूर्ण शेतावरची माती वाहून गेली आणि तिच्या जागी दगड, गोटे व खडक उरले आहेत. तुमची जमीन पुन्हा लागवडीसाठी केव्हा तयार होईल? असे मी त्यांना विचारतो तेंव्हा त्यांच्या नजरा चुकतात. कारण हा प्रश्न त्यांना जड वाटतो. किमान पुढील ३-४ वर्षांत नाही, असे म्हणत ते माझ्या भावनिक अवस्थेकडे बघत जास्त काळजी करतात. मी आमच्या मृद्विज्ञान



तज्ञाला विचारले, काय करता येईल? तो म्हणाला, वरची माती वाहून जाणे म्हणजे सुपीकता व पोषक घटकांचा नाश होणे. दगड व गाळामुळे पेरणी व लागवड अशक्य होईल. पाणी ओसरल्यानंतरही ३-५ वर्षे शेतकरी काही पिकवू शकणार नाहीत. त्यांनी पुढे सांगितले, शेतकऱ्यांना विशेष यंत्रे भाड्याने घ्यावी लागतील कारण दगड काढणे, शेत समतल करणे, लागवडीयोग्य बनवणे, बांध घालणे, आणि नंतर रोटाव्हेटर मशीनने खालील माती वर आणणे याचा



खर्च प्रति एकर किमान ₹१,००,००० येईल. त्यातल्या त्यात जर बाहेरून माती आणावी लागली तर खर्च आणखी वाढेल. मी या गावकऱ्यांबरोबर सात वर्षांपासून काम करत आहे. आमच्या ट्रस्टसोबत काम करणाऱ्या काही हजार शेतकऱ्यांनी कापूस व सोयाबीनच्या पिकांऐवजी फळझाडांची लागवड केली असून ती चांगली चालली आहे व याचा त्यांना फटका बसलेला नाही. परंतु उर्वरित दहा लाखांहून अधिक शेतकरी अजूनही उभ्या पिकांवर अवलंबून असून अत्यंत बिकट अवस्थेत आहेत. तुमच्या खात्यात किमान ₹१,००० आहेत का? मी विचारतो, तर कोणीच हात वर करत नाही. सर, आमच्या खात्यात ₹१० देखील नाहीत. फक्त ₹२०० शिल्लक ठेवून खाते चालवावे लागते, ते लाजत सांगतात. दुसरा शेतकरी आपला शर्ट दाखवतो व म्हणतो, सर, हा ₹१६० चा शर्टच माझ्याकडे आहे. तोही मी फक्त आपण गावात आलात तेव्हाच घालतो. सगळे हसायला लागतात, तोवर एक ४० वर्षांचा माणूस सांगतो, यावर्षी माझ्याकडे आत्महत्या करण्याशिवाय पर्याय नाही. हे खरेच हातावर पोट असलेले जीवन आहे. अशा शेतकऱ्यांकडून आपण ₹१ लाख खर्च करून शेती पुन्हा उभी करण्याची अपेक्षा करू शकतो का? त्यांचं काय होणार?

आम्हाला वाटते की महाराष्ट्र सरकारने किमान ₹५०,००० प्रति हेक्टर इतकी नुकसानभरपाई द्यावी व बाधित भागाला 'ओला दुष्काळ' क्षेत्र घोषित करावे, ज्यामुळे शेतकऱ्यांना त्या योजनेचे फायदे होतील. जसे कर्जमाफी, नव्या पीककर्जाला पात्र होणे, वीजबीलसवलत, ईजीएस (रोजगार हमी) सक्रियन, जनावरे व मालमत्ता नुकसानभरपाई इत्यादी मिळू शकतील.

वास्तविक परिस्थितील आत्ताच्या घडीचे अत्यंत कठीण दिवस आहेत. आम्हाला आशा आहे की सरकार तळागाळातील शेतकऱ्यांचा आवाज ऐकेल, जो सत्ताधाऱ्यांवर संतापलेला आहे आणि त्यांची वेदना दूर करेल. सरकारी कागदोपत्री व प्रोटोकॉलप्रमाणे नव्हे, तर तत्परतेने, सहानुभूतीने व प्रेमाने. हेच माणुसकी व काळजी घेणारे सरकार म्हणून त्यांच्याकडून अपेक्षित आहे. पुढील काही वर्षांत परिस्थितीला कंटाळून आणखी शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या तर त्याची जबाबदारी कोण घेणार?

**– मयंक गांधी, ग्लोबल विकास ट्रस्ट**

◆ पान ७ वरून पुढे...

## गोदावरीच्या पाण्याने....

पाणी सोडण्यात आले. २००६ नंतर पहिल्यांदाच इतके पाणी सोडण्यात आले होते. यामुळे माजलगाव तालक्यातील अनेक गावे पाण्यात आहेत. अनेक गावांना जाण्यासाठी रस्ता राहिलेला नसून मुख्य रस्त्यावर पाणी आहे. दि.३० रोजी सकाळी खा.बजरंग सोनवणे यांनी सकाळी पुरग्रस्तांच्या मदतीसाठी सुरूवात केली. माजलगाव तालुक्यातील टाकरवण, शेलगावथडी, रिदोरी, कवडगावथडी, राजेगाव, हिवरा, काळेगावथडी, महातपुरी, पुरूषोत्तमपुरी, जायकोचीवाडी, सादोळा आदि गावात भेटी दिल्या. यातील अनेक गावातील रस्त्यावर पाणी आहे. सदरील पाण्यातून जाणे मोठे जिकीरीचे काम आहे. परंतु खा.बजरंग सोनवणे यांनी नागरिकांच्या भेटी घेण्यासाठी कवडगावथडी येथे बैलगाडी वापरली. तर काही ठिकाणी दुचाकीवरून प्रवास करत पाण्यातून वाढ काढली. त्यांनी गावात भेट दिल्यानंतर त्यांनी महिला-पुरूषांशी संवाद साधत, गावात पुर आला, संसार भिजला आहे. यामुळे मोठे नूकसान झाले असून यामुळे कोणीही खचून जाऊ नका. तुम्हाला उभा करण्यासाठी आम्ही सरकारकडून मदत मिळवून देऊ, त्यासाठी मी प्रयत्न करत आहे. गावात ज्यांचे घर पाण्यात गेले आहे, त्यांच्या मदतीने आपणच तातडीने जा, त्यांची अडचण समजून घ्या आणि एकेमकांना मदत करा. सरकारी मदत मिळवून देण्यासाठी आम्ही वेळप्रसंगी लढा उभा करू, पण तुम्हाला एकटे सोडणार नाहीत, असा शब्दही खा.बजरंग सोनवणे यांनी दिला. यावेळी त्यांच्यासोबत माजलगाव मतदारसंघाचे नेते मोहन जगताप आणि राष्ट्रवादीचे पदाधिकारी उपस्थित होते.

## निसर्गाचं चक्रच...

पडण्याची शक्यता आहे. देशात जून ते सप्टेंबर दरम्यान सरासरी पावसाच्या १०८% पावसाची नोंद झाली आहे. मराठवाड्यात या चार महिन्यांमध्ये सरासरीपेक्षा १३९% पाऊस झाला. तर ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात सरासरीपेक्षा अधिक पावसाची नोंद झाली. एकट्या सप्टेंबर महिन्यात मराठवाड्यात सरासरीच्या २१५ टक्के तर ऑगस्ट महिन्यात १६९ टक्के एवढा पाऊस झाल्याचं हवामान विभागाने सांगितला आहे. नैऋत्य मान्सूनचा परतीच्या प्रवासात आकाश हे बहुतांश निरभ्र असते. त्यामुळे तापमानात सुमारे ३० ते ३५ अंश सेल्सिअस वाढ होते. ऑक्टोबर महिन्यात माती आणि जमीन ओलसर असते. दिवसा हवामान उष्ण आणि दमट असते आणि रात्री थंड असते. परतीच्या पावसामुळे तापमान वाढते आणि आर्द्रता कमी होते. त्यामुळे ऑक्टोबर महिन्यात उष्णतेचे चटके बसतात. ऑक्टोबर आणि नोव्हेंबर मध्ये सूर्यदक्षिणेकडे सरकत असतो. त्यामुळे उत्तरेकडील मैदानांवर कमी दाबाचा पट्टा कमकुवत होतो. त्यामुळे ऑक्टोबर हिट जाणवते. परंतु यंदा संपूर्ण सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टी नोंदवण्यात आल्याने ऑक्टोबर हिट चे चटके जाणवणार नसल्याचं व हवामान विभागाने सांगितलं आहे. देशभरात जून ते सप्टेंबर दरम्यान सरासरीच्या १०८% पाऊस झाला असून मराठवाड्यात या चार महिन्यांमध्ये सरासरीपेक्षा १३९ टक्के तर एकट्या सप्टेंबर महिन्यात सरासरीच्या २१५ टक्के पाऊस पडल्याचं हवामान खात्याने

◆ पान ७ वरून पुढे...

सांगितलं.

## धनंजय मुंडेंच्या...

करण्यात आला आहे. दरम्यान याआधी काही दिवसांपूर्वी आणखी ४ ग्रामपंचायत इमारतीस देखील याच योजनेतून निधी मंजूर करण्यात आलेला आहे. धनंजय मुंडे यांनी राज्य सरकार सह ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे आभार व्यक्त केले आहेत.

## राजुरी मळा...

तलवाडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आणले दोन्ही युवकांचा जागीच मृत्यू झाल्याने त्यांचे आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करण्यात आले असून दोन्ही युवकावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेमुळे तलवाडा परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## ढाका कुटूंबियांचे...

वडिल देवेंद्र ढाका आणि त्यांच्या कुटूंबियांनी पोलीस अधिक्षकांना दिलेल्या निवेदनात केला आहे. ढाका कुटूंबियांनी आज दुपारी पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांची भेट घेऊन तब्बल दिड तास त्यांच्याशी चर्चा करून सीसीटीव्ही फुटेज आणि जवाबातील सर्व आरोपींना तात्काळ अटक करावी अशी मागणी केली. बीड येथील यश देवेंद्र ढाका याची दि.२५ सप्टेंबर रोजी हत्या झाल्याची दुर्देवी घटना घडली होती. या प्रकरणात यशचे वडिल देवेंद्र ढाका आणि त्यांच्या कुटूंबियांनी आज दुपारी पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांची भेट घेतली. ढाका कुटूंबियांना पोलीस अधिक्षकांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, माझा मुलगा यश ढाका याचा खून करणारा इसम गणेश गोरख शिराळे, निखील घोडके, कृष्णा सोनवणे, सुरज आप्पासाहेब काटे आणि त्यांच्या टोळीने हत्याचा कट रचला आहे. गणेश शिराळे याच्या टोळीने कटकारस्तान रचून माझ्या मुलाचा खून केला आहे. या संदर्भात पोलीस अधिक्षकांनी तपास अधिकाऱ्यांना निर्देश देऊन तातडीने तपास करून सर्व आरोपींना अटक करावी आणि आम्हाला न्याय द्यावा अशी मागणी ढाका यांनी केली. बीड शहरात दहशत पसरवण्यासाठी शिराळे टोळीने हा खून केला असून हे प्रकरण अंडर ट्रायल चालवण्यात यावे अशी मागणीही त्यांनी केली आहे. निष्पाप यशचा यामध्ये बळी गेला, त्यात राजकीय हस्तक्षेप होत आहे. पोलीस अधिक्षकांनी याची सखोल चौकशी करून आम्हाला न्याय द्यावा अशी मागणी देखील ढाका कुटूंबियांनी केली आहे.

## केजमधील कुंटणखान्यावर...

ही कारवाई २९ सप्टेंबर रोजी सायंकाळी गुप्त माहितीच्या आधारे करण्यात आली. पल्लवी भाऊसाहेब जाधव (पीएसआय, अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, बीड) यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. त्यानुसार, गणेश नगर, उमरी रोड येथील वर्षा चंद्रकांत कवचट (वय ५०) ही महिला तिच्या घरी आर्थिक फायद्यासाठी महिलांना बोलावून पुरुष गिऱ्हाईकांकडून पैसे घेऊन वेश्याव्यवसाय चालवित असल्याची माहिती पोलिसांना मिळाली

◆ पान ७ वरून पुढे...

होती. या माहितीवरून पोलीस निरीक्षक स्वप्नील कचरू उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पथक तयार करून दोन पंच व डमी ग्राहकांची नेमणूक करण्यात आली. डमी ग्राहकास ५०० रुपयांच्या तीन नोटा (एकूण १५०० रुपये) देण्यात आल्या. त्यानंतर सायं. ५ वाजता पथकाने छापा टाकला. छाप्यात वर्षा कवचट हिच्याकडे पंचासमक्ष डमी ग्राहकास दिलेल्या १५०० रुपयांच्या नोटा मिळून आल्या. घरातील दुसऱ्या खोलीत ३२ वर्षीय पिडीतेला ताब्यात घेण्यात आले. तिच्या जबाबात ती वर्षा कवचट हिच्यासाठी वेश्याव्यवसाय करीत असल्याचे व प्रत्येक ग्राहकामागे १५०० रुपये घेतले जात असून त्यातील ५०० रुपये तिला देण्यात येतात, उर्वरित १००० रुपये वर्षा कवचट ठेवते असे सांगितले. झडतीदरम्यान पंचासमक्ष १५०० रुपये रोख रक्कम व १५ निरोध जप्त करण्यात आले. प्रकरणी आरोपी वर्षा चंद्रकांत कवचट हिच्याविरुद्ध अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३, ४, ५, ६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारवाईदरम्यान पथकात पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे, पीएसआय पल्लवी जाधव, पोलीस कर्मचारी अहंकारे, मुंडे, मिरा रेडेकर, प्रदीप येवले, अशोक शिंदे, योगेश निर्धार तसेच दोन पंच यांचा समावेश होता.

## पोलीस अधिक्षक...

आहे. त्यांचे हे दातृत्व पाहता जिल्ह्यातील प्रत्येकजण त्यांना सॅल्युट करत आहे.

## बीडमध्ये बांधकाम...

लाटण्यासाठी दलाल आणि अधिकाऱ्यांनी बोगस कामगारांची फौज उभी केली. शहरातील बार्शी रोडवरील एका बांधकामावर बोगस कामगारांचे फोटो शुट सुरू केले आहे. बांधकाम कामगार यांच्यासाठी १५ दिवसांचे प्रशिक्षण शिबीर (ट्रेनिंग) आयोजित केलं आहे. येथे १५ दिवस प्रशिक्षण देण्यात येणार आहे. पंधरा दिवसांनंतर एक ऑनलाईन परिक्षा घेण्यात येणार आहे. त्यात उत्तीर्ण होणाऱ्यास प्रमाणपत्र आणि ४ हजार २०० रुपये अनुदानाची घोषणा केली आहे. यासाठी खासगी दलाल आणि संबंधित अधिकारी यांनी संगनमत करून बार्शी रोडवर एका प्लॉटिंग मध्ये ट्रेनिंग प्रशिक्षण

## अतिवृष्टी मुळे...

कापरी या नदी पात्रातील उच्च दाबामुळे नदीपात्रा लगतच्या शेतजमिनीमध्ये शेतकऱ्यांच्या वैयक्तिक सिंचन विहिरी बुजल्या किंवा वाहून गेल्या. विद्यमान शासन निर्णयानुसार १.५ लक्ष रुपयांची रक्कम मंजूर होती, परंतु नुकसान भरून काढण्यासाठी ही रक्कम ३ लक्ष रुपये करण्यात यावी, अशी विनंती मंत्रीमहोदयांना केली.तसेच , महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत कांदाचाळ बांधकामासंबंधीही चर्चा झाली. शासन निर्णयानुसार दि. १८/५/२०२३ रोजी वैयक्तिक कांदाचाळ बांधकामास मंजुरी देण्यात आली होती; परंतु दि. ९/७/२०२४ च्या शासन शुद्धीपत्रकानुसार सामूहिक कांदाचाळ बांधकाम करणे आवश्यक असल्याचे निर्देश आले. अनेक गावांमध्ये सामूहिक बांधकाम करण्यास

◆ पान ७ वरून पुढे...

अडचणी असल्यामुळे, वैयक्तिक कांदाचाळ बांधकामासही मंजुरी देण्याची आवश्यकता असल्याचे मंत्रीमहोदयांच्या निदर्शनास आणून दिले.त्याचबरोबर आष्टी विधानसभा मतदारसंघातील अनेक गावांमध्ये दि. १४ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत अतिवृष्टीमुळे नद्यांच्या महापुरामुळे संत्रा, डाळिंब, मोसंबी, केळी, लिंबू, द्राक्ष यासह अन्य फळझाडांच्या बागा नष्ट झाल्या. शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाले असल्याने राज्य फलोत्पादन विभागाच्या माध्यमातून दुबार लाभ देऊन आर्थिक दिलासा मिळावा, अशी विनंती केली. तसेच रोजगार हमी योजनेअंतर्गत चालू असलेल्या सार्वजनिक रस्ते, शाळा कंपाउंड यांसारख्या कामांची सद्यस्थिती तपासणी करून आवश्यक सुधारणा करण्यात यावी याबाबत मंत्रिमहोदयांनी या उपाययोजनां करण्याबाबत तात्काळ कार्यवाही होईल असे आश्वासन दिले आहे

## मासूम कॉलनी...

रईसा बेगम अलिमोद्दीन यांच्या कुटुंबावर मोठे संकट कोसळले असून, त्यांचे घरातील साहित्य व अन्नधान्य आणि वस्तूंचे मोठे नुकसान झाले आहे. पावसामुळे आधीच कमकुवत झालेल्या भिंती वाऱ्याचा वेग सहन करू शकल्या नाहीत आणि ही दुर्घटना घडली. नुकसानग्रस्त कुटुंबाला तातडीने प्रशासनाकडून मदत मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. त्याबाबत पंचनामा करण्यात आला, यावेळी मा. नगरसेवक मुखिद लाला , शेख शाजिया, शेख युसुफ, पठाण , पठाण रमजान उपस्थित होते.

## 'सारथी' वसतिगृहे...

करण्याच्या प्रस्तावाला गती मिळालेली नाही. पुणे जिल्हा वगळता इतर कोणत्याही जिल्ह्यात खासगी संस्थांमार्फत ही वसतिगृहे सुरू होऊ शकली नाहीत. खासगी संस्थांनी स्वारस्य न दाखवल्यामुळे ही योजना रखडली आहे.या गंभीर समस्येवर तातडीने तोडगा काढण्यासाठी शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ.ज्योतीताई विनायकराव मेटे यांनी मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष मा.ना.श्री.राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे काल एका निवेदनाद्वारे मागणी केली आहे. डॉ. ज्योतीताई मेटे यांनी निवेदनात स्पष्ट केले आहे की, खासगी संस्थांमार्फत वसतिगृहे सुरू करणे शक्य होत नसल्यास, सरकारने 'छत्रपती शिवाजी महाराज सारथी जिल्हास्तरीय वसतिगृहे योजना' अधिक प्रभावीपणे राबवून तातडीने ही वसतिगृहे सुरू करावीत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी हा निर्णय त्वरित घेणे आवश्यक आहे. डॉ.ज्योतीताई मेटे यांनी केलेल्या या महत्त्वपूर्ण पाठपुराव्यामुळे, मराठा समाजाच्या प्रश्नांवर निर्णय घेण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत हा विषय चर्चेला येणार आहे.आज,बुधवार, दि. ०१ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.०० वाजता सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथे होणाऱ्या या महत्त्वाच्या बैठकीत डॉ. ज्योतीताई मेटे यांना विशेष आमंत्रित करण्यात आलेले असून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हा प्रश्न मार्गी लागणे अत्यंत आवश्यक आहे आणि वसतिगृहांशी संबंधित हा प्रश्न नक्कीच मार्गी लागेल,अशी प्रबळ आशा आहे असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## डॉ.योगेश क्षीरसागर...

खुर्द, नाळवंडी व जुजगव्हाण येथील पुल आदी कामांचे प्रस्ताव मांडण्यात आले. सूचना होताच पुल दुरुस्तीला सुरुवात : शिरूर कासार तालुक्यातील येवलवाडी येथील पुलाच्या दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले असून त्याचाही आढावा घेण्यात आला. तसेच, साक्षाळपिंपरी पुलाच्या दुरुस्तीचे कामही हाती घेण्यात आले आहे. याठिकाणी डॉ.सारिका क्षीरसागर यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली होती. कपिलधारवाडीत संरक्षण भिंत उभारणार : डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दोन दिवसांपूर्वी कपिलधारवाडी येथे जाऊन अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी केली होती. गावात झालेले भूस्खलन लक्षात घेता रस्त्याच्या बाजूने संरक्षण भिंत उभारणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता रविंद्र तोंडे यांना अंदाजपत्रक तयार करण्याचे निर्देश दिले असून तो प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यात आला आहे.

## तलवाडा गाव...

चार महिन्यापासुन या बाबतीत पाठपुरावा करत आहे. तेव्हा जिल्हाधिकारी म्हणाले की तुम्ही माझ्या कडे आले का माझ्या कडे पाठपुरावा केला का जिल्हाधिकारी यांच्या या मिश्किल ऊत्तराने तलवाडा करांना आसा प्रश्न पढला की गेली चार महीने स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगणे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात जि निवेदन दिली ती फोटोसह जिल्ह्यातील जवळपास बहुतांश दैनिकात बातमी सह झळकली हा काय चकवा होता का आसा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत असून स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन हे गाव तलाव संरक्षण भीती लगटच्या आतिक्रमण संदर्भात जिल्हाधिका-यांशी चर्चा करत आसतांना सोबत आसलेल्या पोलीस कर्मचा-याने मधीच मज्जाव केला आसतांना शेख खिजर जैनोदीन त्या कर्मचा-यास म्हणाले की अम्हाला बोलू ध्या की तेव्हा तो कर्मचारी गप्प झाला. हा सर्व प्रसंग ऐकनारे व पहानारे नागरिक या वेळी आशी चर्चा करत होते की जनतेचे सेवक आसनारे कर्मचारी व वरिष्ठ अधिकारी आसे तो-यात वागत असतील तर सर्व सामान्यांनी न्याय मागायचा कुणाकडे?

◆ पान ४ वरून पुढे...

## शिरूर शहरातील...

नाम फाउंडेशनच्या वतीने मदतीचा हात देण्यात आला असून सोमवारी सकाळी त्यांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप सिद्धेश्वर संस्थानवर करण्यात आले. नाम फाउंडेशन नेहमीच संकटाच्या काळात उभा राहत असते या नाम फाउंडेशन ची स्थापना ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर व अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी नेहमीच आपली सामाजिक बांधिलकी कलेबरोबर जोपासली आहे. नाम फाउंडेशन ना आतापर्यंत आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंब, विधवा महिला , नदी खोलीकरण रुंदीकरण , पाझर तलावातील गाळ काढणे, त्याचबरोबर गरीब वंचित मुलांना शिक्षणाच्या प्रवासाने, पशुधनांना चारा पुरविणे, सामूहिक विवाह सोहळे, अजून भरपूर काही मोठ्या प्रमाणावर राज्यातच नव्हे तर राज्याबाहेर सुद्धा मोठ्या प्रमाणावर आपलं सामाजिक दायित्व नाम फाउंडेशन च माध्यमातून हे दोन्हीही अभिनेते करत आहेत साधा मेसेज वरती सुद्धा ही मंडळी दखल घेत असते त्यामुळे राजकीय मंडळीच्या डोळ्यात नाम फाउंडेशनच्या माध्यमातून होणाऱ्या मदतीसाठी झणझणीत एक प्रकारचा अंजनच आहे. अशाच प्रकारे नुकत्याच संपूर्ण मराठवाडा भर झालेल्या पूरग्रस्तांच्या मदतीला सुद्धा नाम फाउंडेशन धावून आले आहे.

## आ.संदीप क्षीरसागर...

मदतीसाठी सतत अग्रेसर असतात. तसेच त्यांनी विविध प्रश्न शासनदरबारी मांडून मार्गी लावले आहेत. या निवडी नंतर विद्यापीठाच्या उपस्थिती होती. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरु यांच्या हस्ते आ.संदीप क्षीरसागर यांचा सन्मान करण्यात आला. त्यांच्या या निवडीबद्दल शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक यासह विविध स्तरातून अभिनंदन होत आहे. या निवडी बद्दल त्यांनी जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रात भरीव कार्य करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

विद्यापीठाच्या सिनेट सदस्यपदी निवड माझ्यासाठी सन्मानाची आणि अभिमानाची बाब -संदीप क्षीरसागर : डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या सिनेट सदस्यपदी महाराष्ट्र विधानसेचे प्रतिनिधी म्हणून माझी निवड झाली आहे. या निवडीबद्दल मी शासनाचे आभार मानतो.तसेच भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या विद्यापीठात माझी नियुक्ती होणे ही माझ्यासाठी अत्यंत सन्मानाची आणि अभिमानाची बाब असून या पदाला न्याय देण्यासाठी शिक्षण क्षेत्रातील

◆ पान ४ वरून पुढे...

प्रगती व विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मी पूर्ण क्षमतेने कार्यरत राहणार असल्याचे आ.संदीप क्षीरसागर यांनी सांगितले.

## मौजे सोन्नाथडी....

करुन मासिक सभा व ग्रामसभा झाल्या आहेत असे कागदोपत्री दर्शविणे, ३). कोणत्याही शासकीय योजनेत स्वतःला व कुटूंबाला जास्तीत जास्त आर्थिक लान करुन घेणे, ४). तसेच ग्रामपंचायत मधील इतर सदस्यांनी सुचविलेल्या विकासकामांना विरोध करुन सदस्यांच्या वार्डामध्ये विकासकामे न होऊ देणे, ५). तसेच सरपंचाने केलेल्या कोणत्याही भ्रष्टाचारा बद्दल अथवा न झालेल्या विकासकामाबद्दल कोणत्याही ग्राम पंचायत सदस्याने जाब विचारला असता, त्या सदस्याला पती केरबा तपसे यांच्या मार्फत अर्वाच्य भाषेत शिव्या देवुन खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी देणे. ६). गावातील नागरीकांना ग्रामपंचायत मार्फत पुरविल्या जाणाऱ्या नागरी सुविधा न पुरविणे. (पाणी, लाईट, रस्ते, सांडपाणी व्यवस्थापन न करणे.) ७). गावातील नागरीकांना व ग्रामपंचायत सदस्यांना दुय्यम दर्जाची वागणुक देऊन नेहमी अपमानीत करणे. ८) स्वतःच्या सरपंच पदाचा व ग्रामपंचायतचा कारभार पुर्णतः पती केरबा तपसे यांच्या मार्फत पाहणे. आदी कारणांचा उल्लेख दिलेल्या अविश्वास ठरावात केला आहे आणि या ठरावात असे नमूद केले आहे की , सदरचा अविश्वास ठराव हा आम्ही वरील कारणामुळे आमच्या राजीखुशीने, कुणाच्याही दबावाला बळी न पडता आज रोजी तहसिल कार्यालय माजलगांव येथे स्वतः हजर राहुन तहसिलदार साहेब यांच्या दालनात दाखल करीत आहोत. या अविश्वास ठरावा वर खालील पैकी उप सरपंचा सह सदस्यांची नावे व स्वाक्षरी आहे. १. विनय व्यंकटराव डक (उपसरंपच), २. पांडुरंग नारायण वगरे (सदस्य), ३. आशामती जाणकीराम पवार (सदस्य), ४. भगवान निवृत्ती कांबळे (सदस्य), ५. बंडु श्रीमंत शिंदे (सदस्य), ६. आशाबाई गिन्यानदेव वाघमारे (सदस्य), ७. जयश्री विष्णु गोरे (सदस्य), ८. उर्मिला रघुनाथ डाके (सदस्य), आदींच्या सह्या आहे. या पार्श्वभूमीवर ४ ऑक्टोबर रोजी या प्रकरणी मा तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली आम सभा घेण्यात येणार असल्याचे तहसील कार्यालया कडून सांगण्यात आले आहे

## पूरग्रस्तांच्या मदतीला....

संकटसमयी समाजासाठी योगदान देणे हीच खरी सेवा या भावनेतून संघ व

◆ पान ४ वरून पुढे...

सेवाभरती कार्यकर्ते मदत कार्यात सहभागी झाले. गावकऱ्यांनी त्यांच्या या पुढाकाराचे मनापासून स्वागत करत कौतुक व्यक्त केले.समाजासाठी अखंड सेवा हाच आमचा संकल्प आहे. पूरग्रस्तांसोबत सदैव उभे राहून त्यांना आवश्यक मदत पुरवली जाईल, असे संघ व सेवाभरतीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

## सिंधफना नदीच्या...

फऊचलण्यासाठी आणि शेतीला योग्य वेळी पाणीपुरवठा करण्यासाठी या पंपांचा मोठा उपयोग होतो. परंतु या आपत्तीमुळे शेती सिंचन व्यवस्थाच विस्कळीत झाली आहे. त्यामुळे पुढील हंगामात पिकांची लागवड आणि उत्पादन धोक्यात आले आहे. झालेल्या शंभर टक्के नुकसानीचे पंचनामे तात्काळ करण्यात यावेत. प्रभावित शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देऊन तातडीने दिलासा द्यावा.तसेच सौर पंप परत बसवण्यासाठी शासनाने मदत करावी. शेतकऱ्यांनी स्पष्ट केले आहे की, जर वेळेत मदत मिळाली नाही तर त्यांच्या पिकांवर आणि उपजीविकेवर मोठे संकट ओढवणार आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने लक्ष घालून निर्णय घ्यावा, अशी मागणी शेतकरी बांधवांनी केली आहे.

## अजितदादा, आता...

यांनी स्थळ पाहणी करत बांधकाम विभागाला पत्र दिले. त्यानंतर २३ रोजी ग्रामस्थांनी रास्ता रोको आंदोलन करून तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्याकडून दोन दिवसांत रस्ता दुरुस्तीचे आश्वासन घेतले. तरीदेखील काम सुरू न झाल्याने आज ग्रामस्थांना आंदोलनाचा मार्ग पत्करावा लागला. पालकमंत्री अजितदादा पवार यांनी स्वतः २५ सप्टेंबर रोजी बीड दौऱ्यात खचलेले रस्ते व तुटलेले पुल तातडीने दुरुस्त करण्याचे आदेश प्रशासनाला दिले होते. मात्र, आदेशानंतरही सहा दिवस उलटून गेले तरी कामास सुरुवात झालेली नाही. निदान या आंदोलनामुळे तरी प्रशासन खडबडून जागे होईल का? असा संतप्त सवाल डॉ.गणेश ढवळे यांनी उपस्थित केला. या आंदोलनात संजय घोलप, अँड. गणेश वाणी, मधुकर जाधव,मनोहर वाणी, सखाराम घोलप, दत्तात्रय ढवळे, सोपान वाणी, प्रकाश ढवळे, शहाजी वाणी, सोनाजी घोलप, तानाजी वाणी, धीरज वाणी,सुरज वाणी,लहु घोलप, जनार्दन वाणी,अक्षय घोलप, विशाल घोलप, राजेंद्र वाणी, बबलु बागल,उमेश वाणी आदी ग्रामस्थ सहभागी झाले होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून पूरग्रस्तांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री सहायता निधीला एक कोटींचा धनादेश



**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यभरात अतिवृष्टीमुळे लाखो हेक्टर शेतीचे नुकसान झाले आहे. या परिस्थितीत शेतकरी बांधवाना मदत व्हावी, यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून पूरग्रस्तांच्या मदतीसाठी एक कोटीचा धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे उपस्थित होत्या. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांनी एक कोटीचा धनादेश मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे मंत्रालयात सुपूर्द केला.

# अनुदानापासून वंचित असणाऱ्या शिक्षकांची दिवाळी गोड करण्याचा शासनाचा प्रयत्न: शिक्षणाधिकारी प्रियाराणी पाटील

### बीड जिल्ह्यातील वाढीव टप्पा अनुदानाच्या आदेशांचे वाटप! अंशतः अनुदानित शिक्षकांत समाधान!

**बीड । प्रतिनिधी**

मागील अनेक वर्षापासून विना अनुदानित शाळेत काम करणाऱ्या शिक्षकांना अनुदान देऊन अनुदानापासून वंचित असणाऱ्या शिक्षकांची दिवाळी गोड करण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचे मत शिक्षणाधिकारी प्रियाराणी पाटील मॅडम यांनी विना अनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांच्या वाढीव टप्पा अनुदान आदेश वाटप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना सांगितले. यावेळी व्यासपीठावर उपशिक्षणाधिकारी नानासाहेब हजारे, उपशिक्षणाधिकारी, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी मनोज





धस, अधीक्षक अजय बहीर, वेतन अधीक्षक राजेश खटावकर, शिक्षक नेते उत्तम पवार, डी. टी. सोनवणे, जितेंद्र डोंगरे, दत्तात्रय चव्हाण आदी उपस्थित होते.

राज्यातील विना अनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांना वाढीव टप्पा अनुदान मिळावे अशी मागणी गेल्या अनेक दिवसा पासून होती. सरकारने ०१ ऑगस्ट २०२५ पासून वाढीव टप्पा अनुदान आणि त्यासाठी लागणारा निधी पावसाळी अधिवेशनात मंजूर केला. या शासन निर्णया प्रमाणे शासनाने ठरवून दिलेल्या निकषांची पूर्तता करणाऱ्या बीड जिल्ह्यातील सर्व शाळांना वाढीव टप्पा अनुदान आदेश तयार करण्यात आले. या वेळी वाढीव टप्पा अनुदान आदेश वाटपाचा कार्यक्रम घ्यावा अशी विनंती महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समिती, स्वराज्य शिक्षक संघटना, शिक्षण समन्वय संघ, बीड जिल्हा मुख्याध्यापक संघ, महाराष्ट्र शिक्षण संस्था महामंडळ याशिवाय शिक्षण क्षेत्रात सातत्याने विविध प्रश्नावरती काम करणाऱ्या विविध शिक्षक आणि शिक्षकेत्तर संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षणाधिकारी श्रीमती प्रियाराणी पाटील मॅडम यांच्याकडे केली. या शिक्षकांच्या आणि त्यांच्या कुटुंबाच्या प्रति शासन सतत सकारात्मक विचार करत आहे. नुकतेच शासनाने या विना अनुदानित शाळांना अनुदानावर आणण्यासाठी आणि अंशतः अनुदानित असणाऱ्या शाळांना पुढील वाढीव टप्प्याचे अनुदान देण्यासाठी आवश्यक असणाऱ्या निधीची तरतूद ही केली आहे. थोडक्यात सांगायचे झाल्यास गेली अनेक वर्षापासून अनुदानापासून वंचित असणाऱ्या शिक्षकांची दिवाळी गोड करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. आज विना अनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांना वाढीव टप्प्याच्या आदेशाचे वाटप करत असताना आम्हाला मनस्वी आनंद होत आहे. पुढील वाढीव टप्प्याचा म्हणजेच १०० टक्के अनुदानाचा वाढीव टप्पा आपणास लवकरात लवकर देण्याचे भाग्य आम्हाला मिळो अशी सदिच्छा यावेळी श्रीमती प्रियाराणी पाटील मॅडम यांनी व्यक्त केली.

## डॉ.भीमराव पिंगळे विद्यालयात नमो संजिवनी स्वास्थ्य अभियानअंतर्गत सर्व विद्यार्थी आणि विद्यार्थिनींची मोफत वैद्यकीय तपासणी करून औषधोपचार

**बीड । प्रतिनिधी**

डॉ.भीमराव पिंगळे विद्यालयात नमो संजिवनी स्वास्थ्य अभियानअंतर्गत सर्व विद्यार्थी आणि विद्यार्थिनींची मोफत वैद्यकीय तपासणी करून औषधोपचार करण्यात आले. या कार्यक्रमासाठी श्री. ओमप्रकाश गीरी (जिल्हा अध्यक्ष कामगार मोर्चा) श्रीमती संध्या राजपूत (महिला मोर्चा प्रदेश सचिव) श्री ज्योतीबा नन्नवरे (भा.ज.पा. कामगार मोर्चा प्रदेश महासचिव) व सर्व आरोग्य अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. सर्व



प्रथम शाळेचे मुख्याध्यापक श्री रोहिदास डोंगरदिवे यांनी श्रीमती संध्या राजपूत यांचे शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.व कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. शाळेतील सर्व शिक्षकांनी सर्व उपस्थितांचे शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. शाळेतील शिक्षिका श्रीमती सोनवणे मॅडम यांनी सुत्रसंचलन केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जवळा हायस्कूल जवळा चे माजी विद्यार्थी श्री ज्योतीबा नन्नवरे यांनी खूप परीश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. सर्व विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी खूप चांगला प्रतिसाद दिला.

## रंजेगाव’ येथे तिर्रट जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा; सहा जणांना अटक! पिंपळनेर पोलीस स्टेशनची कारवाई, एकूण ₹ 1,13,९६0/- चा मुद्देमाल जप्त

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

दिनांक ३०.०९.२०२५ रोजी पिंपळनेर पोलीस स्टेशनच्या पथकाने मौजे रंजेगाव येथे एका जुगार अड्ड्यावर छापा टाकून सहा इसमांना जुगार खेळताना रंगेहाथ पकडले आहे. पोलीस उपनिरीक्षक (पोउपनि) गोलवाल साहेब यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, रंजेगाव येथे अनंत घुमरे यांच्या घरामागे लिंबाच्या झाडाखाली काही इसम पत्त्यांवर पैसे लावून 'तिर्रट' नावाचा जुगार खेळत आहेत. या खात्रीलायक माहितीच्या आधारे पोउपनि श्री. गोलवाल साहेब यांनी प्रभारी अधिकारी सपोनि श्री. घुगे साहेब यांना कळवले. त्यानंतर सपोनि श्री. मधुसूदन घुगे साहेब, पोउपनि अर्जुन गोलवाल साहेब, फिर्यादी दिपक दशरथ धोंडे (पो. काँ/१६३७) आणि इतर पोलीस कर्मचाऱ्यांसह पथकाने पंचांसह घटनास्थळी छापा टाकला. पोलीस पथकाला पाहताच जुगार खेळणारे इसम पळून जाण्याच्या तयारीत असताना त्यांना ताब्यात घेण्यात आले.ताब्यात घेतलेल्या सहा आरोपींची नावे रामेश्वर दादाराव आबुज (वय ६५ वर्ष) विठ्ठल राजाराम आवुज (वय ६७ वर्ष) चंद्रकांत जगन्नाथ आबुज (वय ४२ वर्ष) विनायक बळीराम आबुज (वय ५५ वर्ष) महादेव भरत आबुज (वय ६० वर्ष) राधाकिसन दगडुबा आबुज (वय ६० वर्ष) (सर्व राहणार रंजेगाव, ता. जि. बीड) अशी आहेत. आरोपींच्या अंगझडतीत व त्यांच्या खेळण्याच्या जागेवर जुगारासाठी वापरण्यात आलेली रोख रक्कम आणि सहा मोबाईल फोन मिळून आले. तसेच ५२ पत्त्यांची गड्डी देखील जप्त करण्यात आली. पोलीस अंमलदार दिपक दशरथ धोंडे यांच्या फिर्यादीवरून अटक केलेल्या सहा आरोपींविरुद्ध कलम १२ (अ) जुगार प्रतिबंधक कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई मा पोलीस अधीक्षक नवनीत कावत सो, अपर पोलीस अधीक्षक पांडकर सो व उप विभागीय पोलीस अधिकारी हनपुड सो यांच्या मार्गदर्शन खाली पिंपळनेर येथील सपोनि घूगे, पो उप नी गोलवाल, पोलीस अंमलदार सानप, पठाण, धोंडे, ढकणे व खांडेकर यांनी केली आहे.

## ओझोन थराचे संरक्षण करणे काळाची गरज: प्रा.डॉ. कुशाबा साळुंके




**चौसाळा । प्रतिनिधी**

ओझोनचा थर पृथ्वीला सूर्याच्या अतिरिक्त किरणांपासून वाचवतो. लोकांना या थराचे महत्व समजले पाहिजे.समाजामध्ये ओझोन थराबद्दलजनजागृती झाली पाहिजे यासाठीच १६ सप्टेंबर हा जागतिक ओझोन दिन म्हणून साजरा केला जातो असे प्रतिपादन प्रा.डॉ.कुशाबा साळुंके यांनी व्यक्त केले.कला व विज्ञान महाविद्यालय चौसाळा येथे भूगोल विभागातफे जागतिक ओझोन दिनाबद्दल व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.पुढे बोलताना डॉ. साळुंके म्हणाले की,१६ सप्टेंबर १९८७ रोजी ओझोन थराचे महत्व पटून देण्यासाठी मौनटीयलकरार करण्यात आला. त्यासाठीच हा दिवस ओझोन दिन म्हणून साजरा केला जातो.अध्यक्षीय भाषण करताना प्राचार्य डॉ. पंडित खाकरे म्हणाले ओझोन थराचे संरक्षण करण्यासाठी प्रत्येकाने पर्यावरणाचे संरक्षण केले पाहिजे.

पर्यावरणाचे संतुलन पर्यावरणाचे संतुलन राखण्याचे सजीवश्रुष्टीचे जतन होणार आहे या कार्यक्रमाचे प्रास्ताविकभूगोल विभाग प्रमुख तथा पदयुत्तर संचालक प्रा.डॉ. सुधाकर वणवे यांनी केले.तर यावेळी प्रा.मनीषा रेवागडे आपले विचार व्यक्त केले.या व्याख्यानाचे सूत्रसंचलन प्रा.डॉ.सुर्यकांत देशमुख यांनी केले. तर आभार डॉ.चव्हाण ए.डी.यांनी व्यक्त केले.व्यासपीठावर कमविचे उपप्राचार्य गणपती ढवळशंख उपस्थित होते.

## भारताला परम वैभवशाली करणे हेच संघाचे ध्येय

### अतुल घोरड, बीड जिल्हा कार्यवाह, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

**• शालिवाहन नगर, बीड येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमी उत्सव संपन्न**

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमी उत्सव शालिवाहन नागर बीड येथे आज ३०/०९/२०२५ रोजी संपन्न झाला. राष्ट्रीय स्वंयसेवक संघाच्या स्थापनेला या विजयादशमीला शंभर वर्ष पूर्ण होत असून स्वाभाविकच त्याचा उत्साह संपूर्ण स्वयंसेवकांमध्ये आहे. हिंदू समाजाचे संघटन करून भारताला परम वैभवसंपन्न करणे हेच संघाचे सुरुवातीपासून ध्येय आहे. संघाच्या या शंभर वर्षाच्या प्रवासात संपूर्ण हिंदू समाजाचे सहकार्य संघाला लाभले आहे. समाजाच्या सहकार्यामुळेच हा शताब्दी प्रवास यथोचित झाला आहे. परंतु संघाचे कार्य अविरत अखंडपणे चालणारे आहे. मातृभूमीला परम वैभवसंपन्न करण्यासाठी सर्वांना सोबत मिळून काम करावे लागणार आहे. संघाच्या पंच परिवर्तनातून समाज परिवर्तन



आपल्याला घडवून आणायचे आहे असे वक्तव्य अतुल घोरड यांनी यावेळी केले. यावेळी व्यासपीठावर प्रकाश कानगावकर, अध्यक्ष व्यापारी महासंघ बीड उपस्थित होते. उत्सवाच्या सुरुवातीला शालिवाहन नगरातून संघाचे सघोष पथसंचलन झाले व शस्त्रपूजन नंतर उत्सवाचा समारोप सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स या ठिकाणी झाला.

उत्सवातील प्रमुख वक्ते अतुल घोरड म्हणाले, जेव्हा जेव्हा हिंदू समाजाला आत्मग्लानी आली तेव्हा तेव्हा भारतावर परकीय आक्रमणे यशस्वी झाली. जेव्हा जेव्हा हिंदू समाजात फूट पडली तेव्हा तेव्हा देशाचे विभाजन झाले. त्यामुळे सामर्थ्यवान, बलसंपन्न व राष्ट्रहित सर्वोपरी मानणाऱ्या समाजाच्या आधारावरच भारत परम वैभवसंपन्न होईल. हेच संघाचे सुरुवातीपासून ध्येय आहे. समाजातील भेद संपवून समरसमय हिंदू समाज उभा राहणे केवळ भारतासाठी नाही तर जगासाठी सुद्धा हिताचे ठरणार आहे. कारण भारताच्या शक्तिशाली होण्यातच विश्वाचे कल्याण आहे. भारत जगावर राज्य करण्यासाठी नाही तर जगाचे कल्याण करण्यासाठी विश्वगुरु होत आहे. या ध्येयापासून आपण फार दूर नाही. आपल्या व्यवहारात संघाने सांगितलेले पंच परिवर्तन आणले तर समाज परिवर्तन होणे सहज शक्य आहे. त्यासाठी ‘स्व’चा बोध, सामाजिक समरसता, नागरिक कर्तव्याचे पालन, पर्यावरणपूरक जीवनपद्धती आणि कुटुंब प्रबोधन या पाच विषयांना आपल्या जगण्याचा भाग केले पाहिजे असे ते म्हणाले. या उत्सवात मोठ्या संख्येने स्वयंसेवक, नागरिक व माता भगिनी उपस्थित होते.

## धम्म रॅली, सांस्कृतिक कार्यक्रम आणि धम्म देसनेतून उजळणार ६९ वा धम्मचक्र दिन

**बीड । प्रतिनिधी**

सम्यक संबुद्ध गौतम बुद्धांचे मानवी तत्वज्ञान लोकांपर्यंत जावे यासाठी प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था बीडच्या विद्यमाने आयोजित अखिल भारतीय सहावी बौद्ध धम्मपरिषदेची जय्यत तयारी करण्यात आली आहे. त्यामुळे बौद्ध उपासक-उपासिका,आंबेडकरी जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्था सचिव तथा परिषदेचे मुख्य संयोजक भिक्खु धम्मशील थेरो यांनी केले.


### जाहीर प्रगटन

**मा.श्री. कृष्णराव के. पाटील २ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर बीड ता.जि. बीड यांचे न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १४७१/२०२५

दत्ता जाधव वि. निरंक

मागणी :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत

अर्जदार: १. दत्ता पि. रामभाऊ जाधव, वय: ४३ वर्षे, धंदा मजुरी, रा. गयानगर, जालना रोड, बीड ता जि बीड, २. हनुमान पि. रामभाउ जाधव, वय: ४१ वर्षे धंदा मजुरी, रा. सदर

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे

ज्याअर्थी मयत नामे १) सिताबाई भ्र. रामभाउ जाधव, राहणार गयानगर, जालना रोड, बीड ता. जि. बीड हे दिनांक २५/०८/२०२५ रोजी जिल्हा रुग्णालय, बीड ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत. २) रामभाउ पि. रामचंद्र जाधव, राहणार गयानगर, जालना रोड, बीड ता. जि. बीड हे दिनांक १९/०७/२०११ रोजी कॅनॉल रोड, बीड ता जि. बीड येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार क. १ व २ हे मयतांचे मुले आहेत. दोन्ही मयत आपसात पती पत्नी आहेत. अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत.

मयत नामे सिताबाई भ्र.रामभाउ जाधव व रामभाउ पि. रामचंद्र जाधव यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट मदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत सिताबाई भ्र. रामभाउ जाधव व रामभाउ पि. रामचंद्र जाधव यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर प्रकरणात पुढील तारीख २९/१०/२०२५ आहे.

आज दिनांक ३०/०९/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

(मार्फत- ॲड संजोत महाजन)

आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर, बीड

शिक्का (स्वाक्षरीत) क. लिपीक


## सौ. के.एस.के महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्वच्छता मोहीम संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

सौ.के.एस.के. महाविद्यालयाचे राष्ट्रिय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयाच्या परिसराची स्वच्छता करण्यात आली. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी महाविद्यालयाचा परिसर ज्यामध्ये ग्रंथालय परीसर , वस्तीगृह परीसर व वनस्पती उद्यान या भागाची संपुर्ण स्वच्छता करण्यात आली. या स्वच्छता मोहिमेच्या वेळी स्वंयसेवकांना स्वच्छतेचे महत्व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर यांनी पटवून दिले. ते पुढे म्हणाले की, स्वच्छता ही अत्यंत महत्वाची असून आपले घर, परीसर, महाविद्यालयाचा परीसर नेहमी स्वच्छता ठेवला पाहिजे. कारण




स्वच्छतेमुळे आरोग्याची जपवणूक होत असते. विद्यार्थी हा महाविद्यालयामध्ये जास्त वेळ थांबत असतो. त्यामुळे महाविद्यालयाच्या परीसराचे स्वच्छता नियमीतपणे होणे गरजेचे आहे. स्वयंसेवकांनी स्वच्छता मोहिमेमध्ये उत्स्फुर्तपणे भाग घेतला पाहिजे.या स्वच्छता मोहिमेच्या वेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळानकर, उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे, पर्यवेक्षक प्रा. जालिंधर कोळेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. याशिवाय राष्ट्रिय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. वाय.आर. घोडके , डॉ. पल्लवी इरलापल्ले , डॉ. सय्य्द इमाद, प्रा. जयंत साठे, डॉ. शकील, डॉ. काळे यांची उपस्थिती होती. या स्वच्छता मोहिमेमध्ये स्वयंसेवक मोठया संख्येने उपस्थित होते.


### जाहीर प्रगटन

**मा. श्री. व्ही. सी. जोशी ९ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १३७९ / २०२५

द्वारकाबाई आसाराम बागल वि. निरंक

ज्यापेक्षा आसाराम बाबुराव बागल हे दिनांक १२.११.२००९ रोजी बीड, ता.जि. बीड येथे मयत झालेल्या आहेत. आणि तसेच अर्जदार- १. द्वारकाबाई भ्र. आसाराम बागल, वय ७२ वर्षे, धंदा घरकाम, रा. जुना मोंढा, विठठल मंदिर चौक, रंगार गल्ली, बीड, ता.जि. बीड, २. सुनिल पि. आसाराम बागल, वय - ५३ वर्षे, धंदा व्यापार, रा. जुना मोंढा, विठठल मंदिर चौक, रंगार गल्ली, बीड, ता.जि. बीड, ३. अनिल पि. आसाराम बागल, वय -५७ वर्षे, धंदा मजुरी, रा. जुना मोंढा, विठठल मंदिर चौक, रंगार गल्ली, बीड, ता.जि. बीड, ४.ज्यमल्हार पि. आसाराम बागल, वय- ४९ वर्षे, धंदा व्यापार, रा. जुना मोंढा, विठठल मंदिर चौक, रंगार गल्ली, बीड, ता.जि. बीड, ५.दिलीप पि. आसाराम बागल, वय- ४३ वर्षे, धंदा मजुरी, रा. जुना मोंढा, विठठल मंदिर चौक, रंगार गल्ली, बीड, ता.जि. बीड

अर्जदार कं. १ ही मयत नामे आसाराम बाबुराव बागल यांची पत्नी असून, अर्जदार कं. २ ते ५ हे मयताची मुले आहेत. मयतास मुलगी नाही. मयताचे आई-वडील फार पुर्वीच मयत झाले आहेत. या अर्जदारां व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत, असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहू मयत आसाराम बाबुराव बागल यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी. प्रकरणाची पुढील तारीख १३ /१०/२०२५ आहे.

आज दिनांक २९ सप्टेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

(मार्फत- ॲड जि. पी. शिंदे)

आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर, बीड

शिक्का (स्वाक्षरीत) क. लिपीक



### जाहीर प्रगटन

**मा. माणिकराव रा. सातव ७ वे सह. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ११७४ /२०२५

बाबासाहेब किसनराव गुंदेकर वि. निरंक

अर्जदार - १ बाबासाहेब पि. किसनराव गुंदेकर, वय ५८ वर्षे, धंदा शेती, रा. आंबेसावळी, ता. जि. बीड, २. अरुण पि. किसनराव गुंदेकर, वय: ४९ वर्षे, धंदा शेती, रा. आंबेसावळी, ता. जि. बीड. ३. आशामती भ्र. रामकिसन काळे, वय ४७ वर्षे, धंदा घरकाम, रा. सावळी, ता. मनवत जि. परभणी.

विरुध्द

गैरअर्जदार- निरंक

मागणी : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत किससनराव दादाराव गुंदेकर, रा. मौजे अंबेसावळी ता. जि. बीड, यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी - किससनराव दादाराव गुंदेकर, यांचा मृत्यु दि.०९/०६/२०१९ रोजी रा. मौजे अंबेसावळी ता. जि. बीड, येथे मयत झाले असून अर्जदार १ व २ हे मयताचे मुले असून अर्जदार क. ३ ही मयताची विवाहित मुलगी आहे. तसेच मयताची पत्नी नामे कौशल्याबाई भ्र. किसनराव गुंदेकी यांचा दिनांक ०८/०५/२०२४ रोजी मृत्यु झाला आहे. मयतास अर्जदार वगळता अर्जदारा व्यतिरिक्त ईतर कुणीही वारस नाहीत.

वरील अर्जदार यांना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्र याची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नाही असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहू मयत किससनराव दादाराव गुंदेकर, यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २२/०७ / २०२५ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्याने दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०४/०९/२०२५ आहे.

(मार्फत- ॲड जि. पी. शिंदे)

आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर, बीड

शिक्का (स्वाक्षरीत) क. लिपीक

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● बुधवार, दि. ०१ ऑक्टोबर २०२५ ● पान ४

## थोडक्यात...

### नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदतीसाठी श्री खंडेश्वरी देवी संस्थानचा पुढाकार



बीड । प्रतिनिधी

राज्यसह मराठवाड्यात अतिवृष्टीने सर्वत्र हाहाकार माजवला आहे. यामध्ये शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. शेतकरी वर्ग हा देशाचा कणा आहे हे लक्षात घेऊन बीड शहराचे ग्रामदैवत श्री.खंडेश्वरी देवी मंदिर संस्थानने या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याचे जाहीर करत आहे. मागील दहा ते पंधरा दिवसापासून राज्यसह मराठवाड्यात पावसाने धुमाकूळ घातला आहे. याच अतिवृष्टीचा फटका शेतकरी वर्गाला मोठ्या प्रमाणात बसला आहे. या झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. पिके उध्वस्त झाली असून शेतकऱ्यांवर संकटाचे ढग दाटून आले आहेत. संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना मदतीचा आधार देणे कर्तव्य असल्याचे समजत बीड शहराचे ग्रामदैवत श्री.खंडेश्वरी मंदिर संस्थानने पंचक्रोशीतील नुकसानग्रस्त तीस शेतकऱ्यांना प्रत्येकी दहा हजार रुपयाचे मदत म्हणून देण्याचे जाहीर करत आहे. ही मदत अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देणारी ठरणार आहे. ही मदत दि.६ ऑ३टोबर २०२५ रोजी म्हणजेच कोजागिरी पौर्णिमा दिनी थेट शेतकऱ्यांना धनादेश द्वारे देण्यात येणार आहे. शेतकरी हा देशाचा कणा आहे. तेच जर संकटात सापडले तर शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणे काळाची गरज आहे. याच भावनेतून हे मदतकार्य करण्यासाठी पुढाकार घेतल्याचे श्री.खंडेश्वरी मंदिर संस्थानचे अध्यक्ष श्री.राणा रणजितसिंह चौव्हाण, सचिव विकास गाडेकर, कोषाध्यक्ष राजेंद्र बनसोडे, विश्वस्त दिनकरराव कदम, अंबादास गुरव, सम्राटसिंह चौव्हाण, बंडू खनाळ, अमृतलाल सारडा, अभिजीत शिंदे यांनी म्हंटले आहे.

### समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्र प्रमुख) मर्यादित विभागीय परिक्षा १ ते ५ डिसेंबरपर्यंत

बीड । प्रतिनिधी

राज्यातील सर्व जिल्हा परिषद मधील कार्यरत प्राथमिक शिक्षकांना केंद्रप्रमुख पदावर विभागीय मर्यादित स्पर्धा परीक्षाव्दारे नियुक्ती देण्यासाठी समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्र प्रमुख) मर्यादित विभागीय परिक्षा-२०२५ या परीक्षेचे ऑनलाईन पध्दतीने दि. १ डिसेंबर २०२५ ते ५ डिसेंबर २०२५ या कालावधीत घेण्यात येणार आहेत. परीक्षेबाबतचे अधिसूचना, वेळापत्रक आणि ऑनलाईन आवेदनपत्राबाबतची माहिती महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येणार आहे. परीक्षार्थी/ उमेदवारांनी वेळो वेळी www.mscepune.in या संकेत स्थळाला भेट द्यावी असे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-०४ च्या आयुक्त अनुराधा ओक यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

### बिगरव्यावसायीक / व्यावसायीक अभ्यासक्रम साठी अर्ज सादर करण्यासाठी मुदतवाढ

बीड । प्रतिनिधी

जिल्हयातील इमाव, विमाप्र व विजाभज प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता बिगरव्यावसायीक / व्यावसायीक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना वसतीगृह, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडीत दिनदयाळ स्वयंम योजना (भटक्या जमाती क-प्रवर्गासाठी) अर्ज सादर करण्याची मुदत दि. २९ सप्टेंबर २०२५ पर्यंत देण्यात आली होती. तथापि सदर योजनांना मिळालेला प्रतिसाद लक्षात घेता सदर योजनांना बिगरव्यावसायीक / व्यावसायीक अभ्यासक्रमासाठी दि. २६ ऑक्टोंबर २०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज करण्यास मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तरी विद्यार्थ्यांनी https://hmas.mahait.org या Website वर ऑनलाईन अर्ज सादर करावेत आणि या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याणचे सहाय्यक संचालक, डी.बी.क्षीरसागर यांनी केले आहे. मुलांचे वसतीगृहाचे गृहपाल संपर्क क्र.९६०४६६७६१५, मुलींचे वसतीगृहाचे गृहपाल, ९३२५२३३३३२५ यावर संपर्क साधवा.

### रामराव लोमटे यांचे निधन



केज । प्रतिनिधी

तालुक्यातील होळ येथील ज्येष्ठ नागरिक रामराव नरसिंगराव लोमटे (ताडगावकर) यांचे अल्पशा आजाराने गुरुवारी (दि.२५) निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ८६ वर्षे होते. रामराव लोमटे हे पंचक्रोशीत 'बाबा' या नावाने परिचित होते. अखेरपर्यंत ते वारकरी संप्रदाय तसेच राजकीय क्षेत्रात सक्रिय राहिले. त्यांच्या पश्चात भाऊ, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवा नेते संभाजी लोमटे यांचे चुलते होत. दरम्यान, खासदार बजरंग सोनवणे, माजी आमदार पृथ्वीराज साठे, रमेश आडसकर, प्रा.सुशीला मोराळे यांच्यासह राजकीय व सामाजिक क्षेत्रातील अनेकांनी भेट देऊन लोमटे कुटुंबियांचे सांत्वन केले.

### स्व.केशरकाकू क्षीरसागर यांची १९ वी पुण्यतिथी रामायणाचार्य ह.भ.प.रामराव ढोक महाराज यांचे कीर्तन



बीड । प्रतिनिधी

जिल्ह्याच्या माजी खासदार तथा अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वे मार्गाच्या शिल्पकार स्व.केशरकाकू क्षीरसागर यांची १९ वी पुण्यतिथी दि. ४ ऑक्टोबर २०२५ रोजी असून याच वेळी रामायणाचार्य ह.भ.प.रामराव ढोक महाराज यांचे कीर्तन आयोजित केले असून स्व.केशरकाकूंना अभिवादन करण्यासाठी सर्व चाहत्यांनी उपस्थित राहावे.बीड रेल्वे मार्गाच्या शिल्पकार तथा माजी खासदार स्व. केशरकाकू सोनाजीराव क्षीरसागर यांचे दि. ४ ऑक्टोबर रोजी १९ वे पुण्यस्मरण असून यानिमित्त सकाळी १० वा. पुष्पांजली व ११:०० वाजता रामायणाचार्य ह.भ.प.रामराव ढोक महाराज यांचे सुश्राव्य कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. तरी या कार्यक्रमासाठी सर्व चाहत्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन काकू-नाना प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड.कालिदास थिगळे यांनी केले आहे.

# डॉ.योगेश क्षीरसागर यांची जिल्हा परिषदेसह सा.बां. विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक

## पुरामुळे नुकसान झालेल्या रस्ते, पुलांच्या दुरुस्तीला गती ; काही कामे प्रगतीपथावर

बीड । प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदारसंघातील अनेक भागात झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे रस्त्यांसह पूल वाहून गेले. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होऊन काही गावांचा दळणवळणाचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि.३०) जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागासह सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. यावेळी तातडीची कामे सुरू करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. काही ठिकाणी कामे सुरू असून प्रगतीपथावर असल्याचेही त्यांनी सांगितले.

याआधी राज्याचे उपमुख्यमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी नुकताच बीड विधानसभा मतदारसंघाचा पाहणी दौरा केला होता. त्यावेळी डॉ. क्षीरसागर यांच्या निवेदनानुसार तातडीची रस्ते व पुल दुरुस्तीची कामे तत्काळ हाती घेण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले होते. त्यानुसार डॉ.क्षीरसागर



यांची अधिकाऱ्यांसोबत बैठक पार पडली. बैठकीत जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागासह बीड, शिरूर कासार तालुक्यातील रस्ते, पुल दुरुस्ती तसेच नवीन रस्त्यांच्या प्रस्तावांवर चर्चा झाली. यावेळी प्रभारी कार्यकारी अभियंता श्री.मोमीन, वरिष्ठ, कनिष्ठ व शाखा अभियंता उपस्थित होते. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाची बैठक झाली. यामध्ये कार्यकारी अभियंता रविंद्र तोंडे, उप कार्यकारी अभियंता चंद्रकांत बोराडे, श्री.हागवणे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. दरम्यान, काही ठिकाणची किरकोळ दुरुस्तीची कामे पूर्णत्वास गेल्याचेही सांगण्यात आले.

जि.प. बांधकाम विभागाकडे मांडलेले मुद्दे : पाडळी फाटा ते पाडळी रस्ता, तागडगाव-पाडळी दरम्यान सुमारे १.५ किमी रस्ता, काकडहिरा फाटा-गाव रस्ता, पाडळी खालापुरी ग्रा.क्र.१४ चा ३.५ किमी रस्ता, रौंधवस्तीचा पुल, मंझरीतील मुकादम व धसे वस्ती रस्ते, जांभ-शिरापूर गात ग्रा.क्र.१२१ चा रस्ता व काजळे वस्तीचा पुल, तरडगव्हाण -हाजीपूर -गाजीपूर ग्रा.क्र.१० रस्ता व पुल, पाडळी -जाटवड रस्ता व पुल, पाडळी -ढोकवड ग्रा.क्र.१५ रस्ता, हिंगणी खुर्द येथील ग्रा.क्र.५५१ व ४३६ रस्ते, रुद्रापूर -साक्षाळपिंपरी दरम्यान गीतेवस्ती ग्रा.क्र.२ प्रजामा क्र.२८० रस्ता व पुल, तसेच हिंगणी ▶▶ उर्वरित पान २ वर

### तलवाडा गाव तलाव संरक्षण भीती लगटच्या आतिक्रमण संदर्भात जिल्हाधिकारींना वेळोवेळी निवेदन तरीही जिल्हाधिकारी म्हणतात माझे कडे कधी आलात का

तलवाड़ा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील गाव तलाव संरक्षण भीती लगटच्या आतिक्रमण संदर्भात संबधित सर्व प्रशासनसह वेळोवेळी जिल्हाधिकारी यांना स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगणे हे वारंवार निवेदन देऊन वास्तविकता



दाखवत आले आसतांना देखील निवेदन कर्त्यास जिल्हाधिकारी यांचे बे जबाबदार वक्तव्य! बीडचे जिल्हाधिकारी तलवाडा येथे आले आसतांना स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन यांनी तलवाडा गाव तलाव संरक्षण भीती लगटच्या आतिक्रमण संदर्भात सांगितले की मी गेल्या ▶▶ उर्वरित पान २ वर

### शिरूर शहरातील पूरग्रस्तांना नाम फाउंडेशनचा आधार ; तीस कुटुंबांना दिला किराणा



शिरूर । प्रतिनिधी

सिंदफणा नदीला आलेल्या महापुरामुळे प्रभाग क्रमांक नऊ मधील रहिवाशांचे संसार पाण्यात वाहून गेले होते.सदरील रहिवाशांना ▶ उर्वरित पान २ वर

### आ.संदीप क्षीरसागर यांची डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या सिनेट सदस्यपदी निवड

#### सिनेटच्या सदस्य पदी निवडीनंतर विद्यापीठाच्या बैठकीला उपस्थिती

बीड । प्रतिनिधी

बीड विधानसभेचे आ.संदीप क्षीरसागर यांची डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर विद्यापीठाच्या सिनेट सदस्यपदी निवड झाली आहे. आ.संदीप क्षीरसागर यांची निवड ही विधानसभा अध्यक्ष महाराष्ट्र राज्य यांनी विधानसभेचा प्रतिनिधी कोट्यातून केली आहे. आ.संदीप क्षीरसागर हे



विद्यार्थ्यांसाठी आणि सर्वसाम न्याच्या ▶▶ उर्वरित पान २ वर

### मौजे सोन्नाथडी येथील सरपंच सौ वंदना केरबा तपसे यांच्या विरुध्द अविश्वास ठराव दाखल; 9 पैकी 8 सदस्यांच्या स्वाक्षरी

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे सोन्नाथडी साठी घेण्यात आलेल्या सार्वत्रिक निवडणुक २०२२ मध्ये सौ वंदना केरबा तपसे ह्या सर्वसाधारण साठी राखीव असलेल्या जागेवर जनतेतुन सरपंच म्हणून निवडणुन आलेल्या आहेत व आज रोजी ग्रामपंचायत सोन्नाथडी च्या सरपंच म्हणून कामकाज पाहात आहेत. आम्ही त्यांच्या विरुध्द काल मा तहसीलदार यांच्या कडे अविश्वास ठराव दाखल केला . सरपंच वंदना केरबा तपसे यांच्या विरुध्द अविश्वास ठराव दाखल करण्या बाबतची कारणे खालील प्रमाणे आहेत.



१. गावातील विविध विकासकामात आडकाठी आणुन सदरच्या विकासकामांना विरोध करणे, तसेच वित्त आयोगातील रक्कमेमध्ये प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार करणे. २). तसेच गावात ग्रामसभा व मासिक सभा न घेणे. सदस्यांच्या खोट्या सह्या करुन, ग्रामसेवकांच्या मदतीने खोटा रेकॉर्ड तयार ▶▶ उर्वरित पान २ वर

### पूरग्रस्तांच्या मदतीला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व सेवाभरतीचा हातभार : संसार उपयोगी साहित्याचे वाटप

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा परिसरात झालेल्या अतिवृष्टी व पूरस्थितीमुळे शेकडो कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. अनेकांच्या घरातील साहित्य वाहून गेले, जगण्याची साधनं नष्ट झाली. अशा कठीण प्रसंगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पाटोदा व सेवाभरती संघटनांनी पुढाकार घेत पूरग्रस्त कुटुंबांना संसार उपयोगी साहित्याचे




वाटप करून त्यांना दिलासा दिला.या मदत कार्यांतर्गत पूरग्रस्त कुटुंबांनी भांडीकुंडी यासह दैनंदिन जीवनासाठी आवश्यक असलेले साहित्य देण्यात आले. स्वयंसेवकांनी घराघरात पोहोचून हे साहित्य वाटप केले. पूरामुळे हवालदिल झालेल्या कुटुंबांच्या चेहऱ्यावर या मदतकार्यामुळे समाधान व दिलासा दिसून आला.

▶▶ उर्वरित पान २ वर

### सिंधफना नदीच्या महापूरामुळे शेतकऱ्यांचे सौर पंपाचे शंभर टक्के नुकसान, - नुकसानभरपाईची शेतकऱ्यांची मागणी

बीड । प्रतिनिधी

शिरूर कासार तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांना सिंधफना नदीच्या महापूराचा मोठा फटका बसला आहे. नदीला आलेल्या पुराच्या पाण्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतात बसवण्यात आलेले सौर पंप पूर्णपणे पाण्याखाली गेले असून शंभर टक्के नुकसान झाल्याचे चित्र आहे. शिरूर कासार तालुक्यातील निमगाव मायंबा रामू नाईक तांडा येथील तुळशीराम जयराम राठोड यांच्या गट नंबर ८६६ मधील शेतात झिडान श्री सावित्रा प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचा सोलार पंप बसवण्यात आला होता. मात्र अचानक आलेल्या पुरामुळे केवळ त्यांचाच नव्हे तर परिसरातील अनेक शेतकऱ्यांचा सौर पंप पूर्णतः निकामी झाला आहे. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, सौर पंप हा त्यांच्या शेतीसाठी जीवनरेखा आहे. विहिरीतून पाणी

▶▶ उर्वरित पान २ वर

# अजितदादा, आता तरी पावताल का? लिंबागणेश दुध उत्पादक शेतकऱ्यांचा सवाल

## लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांचे फोटोसेशन, पण रस्ता दुरुस्तीत प्रशासनाचे दुर्लक्ष : डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश ते बोरखेड रस्ता व पुल मुसळधार पावसात वाहून गेल्याने गेल्या १५ दिवसांपासून या मार्गावरील वाणी वस्ती, घोलप वस्ती, गावडे वस्ती, ढवळे वस्ती, घरत वस्ती,मुळे वस्ती येथील दुध उत्पादक शेतकऱ्यांना मोठ्या वाहतुकीच्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. दरम्यान,



लोकप्रतिनिधी व अधिकारी केवळ पाहणी करून फोटोसेशन करून निघून जात आहेत, मात्र प्रत्यक्ष दुरुस्तीची कामे सुरू न झाल्याने ग्रामस्थांच्या संतापाचा पारा चढला आहे. अखेर आज (दि.३०, मंगळवार) सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांनी पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक घालत अजितदादा, आता तरी पावताल का? आम्हाला रस्ता मिळेल का? असा थेट सवाल उपस्थित केला. १४ सप्टेंबर रोजी मुसळधार पावसात हा रस्ता व पुल खचून वाहतूक ठप्प झाली. १५ सप्टेंबरला तलाठी गणपत पोतदार व ग्रामविकास अधिकारी श्रीराम वीर यांनी पाहणी करून वरिष्ठांना अहवाल सादर केला. १९ सप्टेंबर रोजी आमदार संदिप क्षीरसागर

▶▶ उर्वरित पान २ वर